| | |
|---|---|
| MHKO030026902023 | **म.कौ.हिं.सं.का.अर्ज क्र.५२/२०२३.**<br><br>**उमा स्वरुप गडकरी**<br><br>*विरुध्द*<br><br>**स्वरुप प्रकाश गडकरी व इतर.** |

## निशाणी क्रमांक १६ वरील आदेश

**०१.** अर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. सदर कामी वि.प. यांच्या विद्वान विधिज्ञ यांनी युक्तिवाद केलेला नाही. म्हणुन त्यांचे नि.क्र.१२ व १८ वर दाखल केलेले म्हणणे हेच युक्तिवाद समजण्यात येत आहे. अर्जदार यांचा अर्ज व त्यावरिल म्हणणे लक्षात घेता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आहेत. मी त्यावरिल निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार ही तिचे वि.प. यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार ही त्यांच्यावर वि.प. याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| ०३. | अर्जदार ही दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०४. | आदेश काय ? | **आदेशाप्रमाणे.** |

## **का र ण मि मां सा**

**०२.** सदर कामी वि.प. यांनी अर्जदार क्र.०१ बरोबर असलेले त्यांचे वैवाहिक नातेसंबंध व मुलीसोबत असलेले पितृत्वाचे नातेसंबंध मान्य केले आहेत. पत्नी या नात्याने अर्जदार ही वि.प. यांच्याकडुन पोटगी मागण्यास हक्कदार आहे. सदर कामी अर्जदार यांनी वि.प. यांच्याविरुध्द पोलीस ठाण्याला तक्रारी अर्ज दिला असुन त्याच्या प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. याउलट वि.प.यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार यांनी कथन केलेल्या कौटूंबिक हिंसाचाराची सर्व कथने नाकबुल केलेली आहेत. म्हणुन अभिलेखावर दाखल असलेले कागदपत्र व वि.प. यांचे म्हणणे लक्षात घेता कौटूंबिक हिंसाचार झाला का ही बाब पुराव्याअंती निष्कर्षित करणे न्यायोचित वाटत आहे. सदर कामी उपलब्ध कागदपत्रावरुन अर्जदार यांनी वि.प. यांच्याविरुध्द प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे. म्हणुन मुद्दा क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**०३.** अर्जदार या कथन करतात की, वि.प. यांचे एकत्रित कुटूंब असुन वि.प. हे चायनिजचा गाडा, किराणा मालाचे दुकान व रिक्षा चालवितात. त्या पासुन त्यांना दरमहा रक्कम रु.४५,०००/- इतके उत्पन्न मिळते. तसेच ते युक्तिवादात कथन करतात की, वि.प.यांना दरमहा रक्कम रु.६०,०००/- इतके उत्पन्न मिळते. सदर बाबीच्या समर्थनार्थ अर्जदार यांनी वि.प. यांचे व्यवसायासंबंधित फोटो अभिलेखावर दाखल केले आहेत. परंतु या व्यतिरिक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. याउलट वि.प. हे त्यांच्या म्हणण्यामध्ये कथन करतात की, अर्जदार ही कॅटरिंगचा व्यवसाय करित असुन त्यापासुन तिला दरमहा रक्कम रु.२०,०००/- ते ३०,०००/- इतके उत्पन्न मिळते. परंतु त्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. दोन्ही पक्षाचे दरमहा उत्पन्न किती आहे हे अचुक

निदान होत नाही. कोल्हापुर शहरात व्यक्ति काबाडकष्ट करुन दरमहा दहा ते बारा हजार रुपये कमवू शकतो. वि.प.हे शारिरीकदृटया सक्षम व्यक्ति असल्याचे दिसून येत आहे. पती व पिता या नात्याने अर्जदार व तिच्या मुलीचा सांभाळ करणे कायदेशीर जबाबदारी आहे. याउलट एखाली महिला लघुउद्योग करुन उत्पन्न मिळवू शकते. दैनंदिन गरजा, वस्तुंचे बाजारभाव लक्षात घेता सदर कामी अर्जदार क्र.०१ यांना दरमहा रक्कम रु.४,०००/– व मुलीकरीता रक्कम रु.३,०००/– इतके अर्ज दाखल झालेल्या तारखेपासुन सदर अर्जाचा निकाल लागेपर्यंत पुढील आदेश होईपावेता अंतरिम पोटगी म्हणुन देण्यास आदेशित करणे न्यायोचित वाटत आहे. म्हणुन मुद्दा क्र.०३ चे उत्तर अशंतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.०४ करिता खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

**०१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वि.प.यांनी अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.४,०००/– व मुलीकरीता रक्कम रु.३०००/– इतकी अंतरिम पोटगी म्हणुन अर्ज दाखल झालेल्या तारखेपासुन द्यावे.

**०३.** वि.प. यांनी म.कौ.हिं.सं.कायदा कलम १९(३) प्रमाणे तो भविष्यात अर्जदार हिला कोणत्याही प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास होईल अशी कोणतीही कृती करणार नाही असे लेखी बंधपत्र या आदेशापासून एक महिन्याच्या आत दाखल करण्यात यावे.

**०४.** अर्जदार हिला निर्देशीत करण्यात येते की, तिने मुळ अर्जावर विनाविलंब तिचा साक्षीपुरावा सादर करावा तसे न केल्यास अंतरिम आदेशाबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

**०५.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देण्यात यावी.

MAHADEVI SHIVRAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVRAJ MANAGULI
Date: 2024.09.24 11:47:39 +0530

(श्रीमती एम.एस.मनगुळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दि.२०/०९/२०२४. न्यायालय क्र.६, कोल्हापुर.